# स्वदेशी समाज
## आणि
# साधना

मूळ लेखक– रवींद्रनाथ टागोर
अनुवादक– साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**स्वदेशी समाज आणि साधना : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १७०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# स्वदेशी समाज

# अनुवादकाचे निवेदन

१९३२ साली धुळ्याच्या तुरुंगात Greater India हे रवींद्रनाथांच्या चार निबंधांचे पुस्तक मिळाले. त्या इंग्रजी भाषांतराचे हे भाषांतर आहे. ह्या बंगाली पुस्तकाचे नाव 'स्वदेशी समाज' असे आहे. गुजराथीत ह्याच नावाने त्याचे भाषांतर प्रसिद्ध आहे. ह्या चार निबंधांतील पहिल्या निबंधाचे नाव 'स्वदेशी समाज' असे आहे. त्यामुळे तेच नाव पुस्तकास दिले गेले असावे.

हे निबंध वंगभंगाच्या चळवळीनंतर लगेच लिहिलेले आहेत. दुसरा निबंध १९०५-६ मधील, तिसरा निबंध १९०८ मधील व शेवटचा १९०९ ते १० मधील आहे. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी लिहिलेले हे गंभीर निबंध आजही अत्यंत जरुरीचे असे आहेत. १९३४ साली मुंबईत भरलेल्या 'राष्ट्रीय सभे'च्या वेळेस आचार्य काकासाहेब कालेलकर मला म्हणाले, ''तुमच्या इतर पुस्तकांपेक्षा 'स्वदेशी समाज' याचा अनुवाद आधी प्रसिद्ध करा. त्यातील विचार सर्वत्र गेले पाहिजेत.'' काकासाहेबांसारख्या थोरांचे ज्या निबंधांविषयी हे मत आहे, ते निबंध खरोखर किती अमोल असतील नाही ? परंतु मला ते निबंध आतापर्यंत प्रसिद्ध करता आले नाहीत. पू. विनोबाजींची पवित्र गीताप्रवचने 'काँग्रेस' पत्रातून प्रसिद्ध केल्यावर हे निबंध मी त्यातून प्रसिद्ध केले. अनेकांना ते आवडले. आज पुस्तकरूपाने ते बाहेर काढीत आहे.

रवींद्रनाथ द्रष्टे कवी आहेत. प्रज्ञा व प्रतिभा ह्यांचा दुर्लभ संगम त्यांच्या ठायी होऊन ते महाकवी बनले आहेत. ह्या निबंधांतून तीन गोष्टी त्यांनी प्रामुख्याने मांडल्या आहेत.

स्वराज्य स्वावलंबनाने व त्यागाने मिळेल ही पहिली गोष्ट. त्यासाठी राष्ट्रव्यापक संघटना करून तिच्या द्वारा सर्वत्र सेवा व प्रचार करून जनता जागृत करणे ही दुसरी गोष्ट. तिसरी गोष्ट म्हणजे सर्वांना प्रेमाने नांदवण्याचा महान भारतीय प्रयोग.

ज्या वेळेस हे निबंध लिहिले गेले त्या वेळेस राष्ट्रात भिक्षांदेही करणारा एक राजकीय पक्ष व दुसरा प्रक्षुब्ध जहाल पक्ष असे दोन पक्ष होते. रवींद्रनाथांनी त्या वेळेस सांगितले, ''भिक्षांदेही ताज्य आहे. त्याबरोबरच केवळ आदळ-आपट करणे म्हणजेही सामर्थ्य नव्हे.'' त्या वेळच्या राष्ट्रीय सभेतून इंग्रजीतून व्याख्याने व्हावयाची. जनतेशी संबंध नसावयाचा. राष्ट्रीय संस्था कशी असावी ह्याचे विचार ह्या निबंधांतून मांडलेले आहेत व आज ते महात्मा गांधींच्यामुळे प्रत्यक्षात आले आहेत. राष्ट्रीय सभा आज जनतेची झाली आहे. हिंदीतून कारभार होऊ लागला आहे. ग्रामीण जनतेतही राष्ट्रीय सभा भरते. तेथे ग्रामोद्योग, खादी, शिक्षण वगैरेची प्रदर्शने असतात. तेथे कलांचा सत्कार असतो. पोवाडे, सुंदर नृत्ये यांचाही अंतर्भाव होतो. अशा रितीने जनतेत आपण जात आहोत. ठायाठायी आश्रम स्थापले गेले आहेत. त्यांचे मार्फत सेवा होत आहे. जनता ह्या आश्रमास साहाय्य करीत आहे. रवींद्रनाथांच्या कल्पना महात्माजींनी मूर्तिमंत केल्या आहेत. स्वावलंबी बनून, सेवेने जनतेत जागृती करून स्वराज्य संपादण्याचा हा विधायक मार्ग आहे.

रवींद्रनाथांनी भारताचे भवितव्य जे सांगितले आहे तेही भव्य व उदात्त आहे. भारताच्या इतिहासातील सोनेरी सूत्र कोणते ? ह्या हिंदुस्थानात नाना जाती, जमाती, नाना धर्म व नाना संस्कृती आणून तो भारतभाग्यविधाता एक महान प्रयोग करून पाहत आहे. जगातील सर्व धर्म व सर्व संस्कृती येथे संयमाने नांदवून एक दिव्य संगीत निर्माण करणार आहे. भारतीय उद्यानात ही भिन्नभिन्न संस्कृतीची फुले फुलतील व संमिश्र सुगंध येथे दरवळेल. ह्या सर्वांची मिळून शतरंगी, शतगंधी भारतीय संस्कृती बनेल. भारत जगाला भिन्नतेत अभिन्नता कशी पाहावी ते शिकवील. ह्यासाठी हा भारत जगला आहे. आज हिंदू-मुसलमान परस्परांचे शत्रू होऊ पाहत आहेत. हिंदूंचाच हिंदुस्थान कोणी म्हणत आहेत तर हिंदुस्थानात एक स्वतंत्र पाकिस्तान निर्मू असे मुसलमान म्हणत आहेत. भारताच्या इतिहासाचा आत्मा अशांना मिळालेला नाही. भारतमाता सर्वांना जवळ घेऊन नांदवण्याचा प्रयोग प्राचीन काळापासून करीत आहे. त्या दैवी प्रयोगात सामील होऊ तरच तरणोपाय आहे. जोपर्यंत हा महान प्रयोग दृष्टीसमोर ठेवून तद्नुरूप आपले सारे उद्योग चालणार नाहीत तोपर्यंत आपली कष्टदशा नष्ट होणार नाही, असे हा महान कवी, हे गुरुदेव बाहू उभारून, पुकारून पुकारून सांगत आहेत.

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।।**

हिंदू धर्म, मुसलमान धर्म असल्या गोष्टी जरा दूर करून सर्वांना नांदवू पाहण्याचा भारतमातेचा महान धर्म, हा देवदत्त धर्म तोच आपला धर्म करू या. माणुसकीच्या अशा महान धर्मात सर्व धर्मांचे सार येऊनच जाते. माणुसकी असेल तर धर्म आहे. माणुसकीविहीन धर्म, हा धर्मच नव्हे, असा रवींद्रनाथांचा संदेश आहे. ३० वर्षांपूर्वी तो त्यांनी दिला. आता तरी तो ऐकू या व भारताचे भाग्य फुलवू या.

सन १९४०

**– साने गुरूजी**

# अनुक्रमणिका

## स्वदेशी समाज


| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्वदेशी समाज | ............ | ११ |
| २. | हे सारे कसे घडवून आणावयाचे ? | ............ | ३० |
| ३. | सर्वांचा मिळून एकच राष्ट्रीय पक्ष होऊ दे ! | ............ | ४७ |
| ४. | विशाल भारतात पूर्व-पश्चिमेचा संगम | ............ | ६३ |


## साधना


| | | | |
|---|---|---|---|
| ५. | व्यक्ती आणि विश्व | ............ | ८३ |
| ६. | आत्म्याची अनुभूती | ............ | ९६ |
| ७. | पापाचा प्रश्न | ............ | १०९ |
| ८. | व्यक्तीचा प्रश्न | ............ | १२० |
| ९. | प्रेमरूपाने साक्षात्कार | ............ | १३३ |
| १०. | कर्मरूपाने साक्षात्कार | ............ | १४५ |
| ११. | सौंदर्यरूपाने साक्षात्कार | ............ | १५७ |
| १२. | अनंताचा साक्षात्कार | ............ | १६३ |


✦✦✦

# स्वदेशी समाज

आपल्या देशात राजा लढाया करी, परचक्रापासून रक्षण करी व कायद्याची अंमलबजावणी करी. परंतु बाकीच्या सर्व गोष्टी समाजच करीत असे. पाणीपुरवठ्यापासून ते ज्ञानदानापर्यंतची सारी कामे समाजच संपादी. शेकडो राजे येत व जात. परंतु हा सामाजिक धर्म नष्ट होत नसे. अत्यंत सुलभतेने व स्वाभाविकपणे ही सेवाकर्मे होत असत. राजे एकमेकांशी सारखे लढत. परंतु मंदिरे उभारली जात, प्रवाशांसाठी धर्मशाळा बांधल्या जात. विहिरी, तलाव, खोदले जात, पंतोजी शिकवीत असत, रामायण वाचले जात असे, कथाकीर्तने सुरू असत. सामाजिक जीवन बाह्य मदतीवर, कोणा सरकारावर अवलंबून नसे. आपण केवळ परावलंबी पशू बनत नसू. बाहेरच्या स्वाऱ्याशिकाऱ्यांनी, राजघराण्यांच्या येण्याजाण्यांनी, ही सामाजिक जीवनातील प्रशांत व सुंदर स्वतंत्रता नाहीशी होत नसे.

परंतु आज कोठे आहे ती स्वाधीनता ? आज पाणीपुरवठा नाही, रस्ता चांगला नाही, गावात शाळा नाही, म्हणून आपण रडत बसतो. आपल्या या सर्व गाऱ्हाण्यांचे जे मूळ त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. आपण लक्ष देऊ तर आपणास वाईट वाटेल. सार्वजनिक जीवनात अत:पर आपले मन रमत नाही. ते कोठे तरी बाहेर चालले आहे, असे आपणास दिसून येईल.

एखाद्या गावाजवळून वाहाणाऱ्या नदीने जर आपला प्रवाह बदलला तर त्या

गावाचे भाग्य नाहीसे होईल. तेथील मळे, तेथील बागा दिसणार नाहीत. ते गाव ओसाड पडेल. घुबडे व वटवाघळे फक्त दिसू लागतील. नदीच्या प्रवाहाचे जसे हे महत्त्व आहे, तितकेच किंबहुना थोडे अधिक, मानवी मन:प्रवाहाचे आहे. आपल्या विचारांचा प्रवाह पूर्वी सामाजिक जीवनात रमत असे. त्यामुळे खेड्यापाड्यांतील वृक्षराजीत आनंद, समाधान व शांती ही निर्दोष व पवित्र राहिली होती. परंतु जनतेचे चित्त आता भटक्या मारू लागले आहे. खेड्यांना सोडून ते दूर जाऊ लागले आहे. त्यामुळे खेड्यांतील तळी गाळाने भरून गेली, मंदिरे पडून गेली. खेड्यांत ना आनंद, ना काही.

आता सरकारने पाण्याची सोय करावी, सरकारने आरोग्याची व्यवस्था करावी, सरकारने शिक्षण द्यावे, अशाप्रकारे सरकारच्या दारात आपण भीक मागत आहोत. पूर्वीचे वैभवशाली झाड आज वरून मदतीचे चार थेंब मिळतात का अशी आशाळभूतपणे वाट पाहत आहे. आपली ही याचना कोणी थोडीफार पुरविली तरी त्यात काय शोभा ?

इंग्लंडमध्ये सरकार ही मुख्य व सर्वश्रेष्ठ संस्था आहे. आपल्या देशातील राजशक्ती व इंग्लंडमधील राजशक्ती यात फार भेद होता. लोकांच्या सुस्थितीची मुख्य जबाबदारी इंग्लडमध्ये सरकारवर असते. तसे हिंदुस्थानात नसे. असलीच तर फार थोडी असे. जे ऋषिमुनी समाजास मोफत शिकवीत, त्यांचे रक्षण व पोषण राजांना करावे लागत नसे असे नाही. परंतु त्याची मुख्य जबाबदारी गृहस्थांवर असे. राजाने मदत दिली नाही किंवा राजाच नसला, तरी समाजातील मुख्य मुख्य गोष्टींस त्यामुळे धोका पोचत नसे. पाण्याची सोय राजा करीत नसे असे नाही. परंतु इतर संपन्न लोक ज्याप्रमाणे आपले कर्तव्य मानीत, तसेच ते राजाही मानी. राजाने हयगय केली तरी जलसंचय नाहीसे होत नसत. तलाव कोरडे पडत नसत. पाठशाळा बंद पडत नसत. कारण मुख्य आधार राजा नसून गृहस्थ असे.

इंग्लंडमध्ये प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची सुखे, स्वत:ची करमणूक, स्वत:चा स्वार्थ ही संपादण्यात कोणताही प्रत्यवाय नाही. सार्वजनिक कर्तव्यांनी ते बांधलेले नाहीत. महत्त्वाच्या साऱ्या जबाबदाऱ्या तेथे सरकारवर आहेत. आपल्या देशात राजावर फार जबाबदारी नसे. राजा कसा आहे याची फिकीर जनता फार करीत नसे. कारण आपले



सार्वजनिक जीवन ते राजावर अवलंबून ठेवीत नसत. सारी जबाबदारी समाज पार पाडी. ही जबाबदारी समाजातील निरनिराळ्या घटकांवर नीट सोपविलेली असे. श्रमविभागणीची ही भारतीय पद्धती फार कार्यक्षम व अत्यंत आश्चर्यकारक अशी होती.

यामुळे आपल्या जीवनात सर्वत्र धर्म भरून राहिला होता. संयमाचा अभ्यास प्रत्येकास करावा लागे. यावरून एक गोष्ट आपल्या ध्यानात येईल की, भिन्नभिन्न संस्कृतीत जीवन निरनिराळ्या स्वरूपाचे असते. एका संस्कृतीत राजकीय संस्थेला ते स्थान तेच दुसऱ्या संस्कृतीत असेल असे नाही. लोकहिताची जबाबदारी ज्या संस्थेवर तेथे राष्ट्राचे हृदय उडत असते. तेथे घाव पडेल तर तो वर्मी पडला असे होऊन समाज निर्जीव होईल; राष्ट्रास प्रेतकळा येईल. इंग्लंडमध्ये सरकार ही संस्था मुख्य, तर आपल्याकडे समाज ही संस्था मुख्य. इंग्लंड वाचविणे म्हणजे इंग्लंडमधील सरकार वाचविणे. हिंदुस्थान वाचविणे म्हणजे आमची समाजाची घडी वाचविणे. म्हणून इंग्लंडमध्ये सरकार अत्यंत दक्ष राहते. आणि इंग्रजांनी हिंदुस्थानात काढलेल्या शाळांत शिकून आपली अशी समजूत होत आहे की बेफिकीर असणाऱ्या येथील सरकारी अंमलदारास मधूनमधून जागे करणे एवढेच हिंदी माणसाचे काम ! परंतु दुसऱ्याला औषध पाजून माझा रोग हटणार नाही, ही साधी गोष्टही न कळण्याइतकी आपली केविलवाणी स्थिती आज झाली आहे.

चर्चेची व वादविवादाची आपणास फार हौस. परंतु चर्चेने पाऊल पुढे पडेल असे मात्र नाही. इंग्लंडमधील सरकार आज कित्येक वर्षे उत्क्रान्त होत आहे. लोकांच्या सदिच्छेवर ते चालले आहे. वादविवादाने त्यांच्या स्थितीप्रत आपण पोचू शकणार नाही. आपल्या देशातील हल्लीच्या सरकारचा आपल्या सामाजिक रचनेशी यत्किंचितही संबंध नाही. अशा या परकी सरकारपासून आपण जितके जितके अपेक्षू, तितके स्वातंत्र्याचे मोल आपणास दिले पाहिजे. जितकी सरकारपासून अपेक्षा करू तितके त्याचे गुलाम होऊ. ज्या ज्या गोष्टी सरकारने कराव्या असे आपण म्हणू, त्या करण्याची आपली शक्ती आपण गमावून बसू. आणि जी दुर्बलता पूर्वी आपल्या समाजात नव्हती ती आपल्या अंगी येऊन बसेल. केवळ सरकारच्या तोंडाकडे पाहणारे आपण होऊ.